पुढारी

# मेट्रो दिनदर्शिकेत झळकणार विद्यार्थ्यांनी रेखाटलेली चित्रे

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या २०१९ दिनदर्शिकेमध्ये काही आकर्षक चित्रे पाहायला मिळणार आहेत. दिनदर्शिका सर्वोत्तम असावी, यासाठी एमएमआरसीने मुंबई मेट्रो ३ च्या कामकाजाचा आढावा दर्शवणारी चित्रे रेखाटली आहेत. ही २० चित्रे जे.जे.स्कूल ऑफ आर्ट्सच्या विद्यार्थ्यांनी काढली आहेत. एमएमआरसीच्या मुख्य कार्यालयात या चित्रांच्या प्रदर्शनाचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते.

प्रदर्शनाला एमएमआरसीच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांच्यासह अनेक मान्यवरांनी हजेरी लावली. परीक्षक प्रभाकर कोलते, अभय सरदेसाई, अंजली गुप्ते यांनी निवडलेली ६ चित्रे दिनदर्शिकेमध्ये झळकणार आहेत.

**या विद्यार्थ्यांची कला आणि त्यातून व्यक्त होणारी अचूकता अविश्वसनीय आहे. त्यांनी मेट्रो-३ च्या कामाचा आढावा इतक्या सहजतेने घेतला आहे हे खऱ्या अर्थाने कौतुकास्पद आहे.**

**- आश्विनी भिडे,**

**व्यवस्थापकीय संचालक**

सुरज लोहार, आनंद प्रताप, निलीशा फाड, अभिजित पाटोळे,अनिरुद्ध सूर्यवंशी, प्रतीक राऊत या विद्यार्थ्यांची चित्रे सर्वोत्तम ठरली.

